स्त्री एकांकिका

# मोर्चा

विजय खाडिलकर



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मोर्चा

एकांकिका

## विजय खाडिलकर

# मोर्चा

## एकांकिका

लेखक: विजय खाडिलकर

1403, माझगांव टोवर्स, म्हातारपाखाडी, माझगांव, मुंबई 400010

दूरध्वनि: 23776889, मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

इ मेल vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : २१ मार्च २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- विजय खाडिलकर - ९८२१२२२०४२

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री विजय खाडिलकर



कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना “खिडक्या” व “धर्म” या कथासंग्रहांचे लेखक आणि  वास्तुपुरुष या नाटकाचे नाटककात म्हणून ओळखतात. त्यांच्या तिनही ई पुस्तकांना वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे चौथे पुस्तक. तिसरा कथासंग्रह.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह व नाटक असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. खिडक्या, लालबत्ती, सरसरती सर. परिक्रमा: हे कथासंग्रह व वसंतचाहूल हा कवितासंग्रह, पारंब्या..ही कोमसाप स्पर्धेत तृतिय पारितोषिक पात्र कादंबरी. या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते त्याचबरोबर त्याहून वेगळं लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

पात्रांच्यामागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा पूल असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

'मोर्चा' हे विजय खाडिलकर यांनी लिहिलेले एक सुरेख ई-पुस्तक (एकांकिका) आहे. विजय खाडिलकर यांनी यापूर्वी 'खिडक्या', 'धर्म' हे कथासंग्रह आणि 'वास्तुपुरुष' हे नाटक लिहिले असून, त्यांच्या लेखनावर प्रसिद्ध साहित्यिक जी. ए. कुलकर्णी यांच्या शैलीचा प्रभाव दिसून येतो

या एकांकिकेचे कथानक पोर्ट ट्रस्टच्या जागेवर वसलेल्या एका झोपडपट्टीतील सामान्य आणि कष्टकरी माणसांच्या दैनंदिन जीवनाभोवती फिरते. नाटकाच्या केंद्रस्थानी सीताबाय आणि जनाबाय या दोन शेजारी

राहणाऱ्या महिला आहेत. त्यांच्यात पाण्यासाठी, जागेसाठी आणि एकमेकींच्या साध्या-साध्या कृतींवरून रोजच कडाक्याची भांडणे होत असतात. या वस्तीत जुम्मन टेलर, बंगाली मच्छीवाला मन्सूर, फरानाभाभी आणि शेवताबाय असे विविध धर्मांचे आणि प्रांतांचे लोक एकत्र राहतात, ज्यांच्या संवादातून वस्तीतील वास्तवाचे आणि गुंतागुंतीच्या नातेसंबंधांचे चित्रण उलगडते

नाटकाला खरी कलाटणी तेव्हा मिळते, जेव्हा पोर्ट ट्रस्टचे लोक झोपड्या पाडणार असल्याची बातमी येते आणि एका राजकीय कार्यकर्त्याकडून याविरुद्ध 'मोर्चा' काढण्याचे ठरते. 'मोर्चा' हा शब्द ऐकताच सीताबाय आणि जनाबाय आपले वैयक्तिक वाद आणि भांडणे तत्काळ विसरतात. मोर्चात मिळणारा वडापाव-नाश्ता आणि आपली घरे वाचवण्याची धडपड यापायी त्या हातात झेंडे घेऊन मोठ्या उत्साहाने मोर्चात सहभागी होतात

माणसांमधील गरिबी, त्यांचा जगण्याचा संघर्ष आणि मोठ्या संकटाच्या वेळी सर्व मतभेद विसरून दाखवली जाणारी मानवी एकजूट, लेखकाने या एकांकिकेतून अत्यंत खुमासदार, तरल आणि मार्मिकपणे मांडली आहेविजय खाडिलकरांचं हे ई पुस्तक तुम्हाला कसं वाटलं ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद

सुनीळ सामंत, टीम ई साहित्य

# अर्पण पत्रिका

## मानवी मनातील जिद्द आणि लढाऊ वृत्तीला समर्पित

## **     मोर्चा **

नेपथ्य... डाव्या कोप-यात मोहोल्ल्याबाहेर जाण्याची गल्ली, तिला लागून टेलरच्या दुकानाचं अर्ध उघडं शटर, त्यात फ़क्त कपड्यांची केस, त्याला लागून भिंत नि बाहेर दोरी नि आत जायला एक

बोळ..त्याला लागूनच दुसरं दार नि दोन्ही दारात पाण्याची पिंप म्हणावी असं कायतरी..मग उजव्या बाजूला मोहोल्ल्यात जाणारी गल्ली.तिथे टेकवून ठेवलेली शिडी...तिला लागून काटकोनात एक पत्र्याचं बंद दुकान नि वर उघडी खिडकी खाली पिंपाजवळ कपडे धुण्याची सोय...

पात्रपरिचय.:

डावीकडच्या दुकानातला टेलर जुम्मन, बाजूच्या घरात सीताबाय नि दुसरीकडे जनाबाय..

जुम्मन नि जनाबाय सीताचे भाडोत्री..

बोळातल्या एका दारातून मधेच डोकावणारी नि कपडे धुणा-या लॅलावर खेकसणारी कौसर,

वरच्या खिडकीत फ़रानाभाबी..खाली बंद गाळयात साबण बनवणारा सकाळीच बाहेर जातो..

मधेच डावीकडून येऊन कौसरच्या गल्लीत जाणारी नि परत शिडीवर चढून जनाबाईच्या छतावर वाळवण ठेवायला येणारी शेवताबाय..

समोरच्या गल्लीतून ढोल घेऊन डावीकडच्या रस्त्याकडे जाण्यासाठी बाहेर पडणारा बुटका चंदर नि डावीकडच्या गल्लीच्या तोंडाशी पाटी घेऊन येणारा बंगाली मच्छीवाला मन्सूर..आणि उजव्या समोरच्या गल्लीतून बाहेर पडणारे मोर्चेकरी..म्हणजे एक कार्यकर्ता नि बॅनर धरलेली दोन मुलं...

सीताबाय: 'काय ठोकायली ग माह्या भिंतीवर ?'

(सीताबाय आपल्या बोळकंडीसारख्या दारातनं बाहेर येत हातातलं आल्मिनचं भगुणं दारातल्या पाण्याच्या टिपावर ठेवते. तिच्या मधल्या भिंतीला हादरा बसतो म्हणून भितीपोटी ती बाहेर येते..)

जना: 'मसाला वाटती. '

सीता: अगं बये, भिंतीवर वाटती का काय ? घर हादरतंय समदं ! "

जना: आगं दगूड सरकाय लागला तं धक्का बसलंच ना..

सीता: 'आगं भवाने मंग भाईर यून वाटाय काय झालं. माहं घर कोसळू घालती का काय तरी. '

जना: 'कोसळंल कसं ? मातीचं हाय का ? शिमिटाचं हाय ना...आनि झालंच काय तर तुह्याकडं डिपासिटाचं पैसं हायतंच कि. '

सीता: 'लई रूबाब नगं दावू तुह्या पैशाचा. डिपासिट तर ह्या टेलरनंबी भरलंय्. त्यो -हातोय का नै ? तेबी मह्या फुडल्या अर्ध्या जागत. तू तर फाटीफुडं  अख्खा कमरा वापरती ..'

जना: 'मंग भाडंबी तसंच घेती कां नाय? त्यो टेलर यवडी गि-हाइकी करतोय तरी हजारच घेतोय पर माह्या दादल्याकडनं डबल घेती का नाय्. तेबी पावसापान्याचं गळतंय तरी .'

सीता: 'मंग काय तुह्या डुईवर छाता धराय यऊ काय ग भवाने ? '

जना: 'आगं बये पत्रं बदलाय व्हतंय् का न्हाई ? मह्या टिव्हीवर पानी पल्डं तर देशीन का भरून? '

सीता: 'लई रूबाब सांगायली टिव्हीचा. येतंय् कोन तुह्याकडं ? '

जना: 'तुही लेक येती का नाय इचार, तू कामाला गेल्यावं .'

सीता: 'तुह्या पोराला खेळवती का नाय मंग ? आन् त्येबी खेळतंय् तिच्च्यासंगट तं तू का जळाय् लागली ?'

जना: 'म्हूनच सांगती का पत्रं बदल पावसाआदुगर. न्हायतं पोरीला लावून दिन माघारी .'

सीता: ' मंग दे लावून. तिलाबी बघती मी पर तुहा ह्यो कारखाना थांबवती का नाय्. न्हाईतं भाईर वट्यावर यून वाटन कर काय आसन त्ये.. '

जना: हां, समद्या गांवाला दावू का काय मी काय रांधतीय़ त्ये ?

सीता: हा...हाय ठावं तू रोज वशाट करती ते..

( एवढयात सीताबायचा ओरडा ऐकून तिच्या घराच्या पुढच्या भागात पार्टीशनपलिकडे टेलरिंगचं काम करून भरपूर पैसे कमवणारा जुम्मनही काय झालं म्हणून बघायला बाहेर येतो.).

जुम्मन: 'अरे बंद कर वो तेरा मसाला पिसना. कितनी आवाज करती हॆ..घर गिरा देगी क्या ? ऑर मेरा गि-हाकका कपडा खराब होंगा तो तुम भरके देंगा क्या ? और तूबी सिताबाय, कैसा भाडूत रख्खा है. '

(आपल्या दाराशी येत मग जनाबाई टेलरला बोलते )

जना: 'तेरे मूँ नही लगना मेरेको. मेरा आदमी आएगा तब बात करना. आन् तूबी सिताबाय ,उगा कटकट करू नगं. काय कोसळत नाय् तुहं घर. हाय तं पोट्रस्टच्या जागंत. कवा यिल कोन आन पाडून टाकल तं समदंच कच-यात जाईन. '

सीता: 'आस्सं ? तू तं लई शानी व्हऊन राहयली माही बाय्. कुडं जागा भेटना झाली तवा माहेच पाय धरायले आल्ता तुहा दादला. आता बघंतीच, तू पैप कसा लावती त्ये. पानीच नाय् भेटलं तं काय करशीन् गं मंग भवाने ?'

जना: 'त्येबी फुकट द्यायली का काय ? तेचंबी मोजून दाम घेतीसच कि. मुन्शिपाल्टीवाला आला तं काय व्हईन ? पोट्रस्टची जागा

न् मुन्शिपाल्टीच्या पायपाला पंप लावून पानी खेचतीयास .
काय नगं दाकवू मालकिनीचा तोरा. ’

सीता: 'आता तू वाटायचं थांबवती का नाय ?’

(निरूत्तर झाल्यामुळे सीताबाय टेलरकडे हातवारे करते..तो आपल्या गाळ्यात जातो. दाराशी आलेली जना मग आणखीच तावातावाने बोलायला लागते. तो कालवा ऐकून आजूबाजूच्या दारात कामं करणा-या बाया बघायला लागतात. तशीच दोन घरांच्या मधल्या बोळातून डोकावत कौसर सीताबायच्या शिडीजवळ ठेवलेल्या टिपाशी उभी राहून भांडण ऐकणा-या लैलाला विचारायला लागते.)

कोसर: (ओढणी माथ्यावर सरकवत ) अरी लैला, मेरा सामान किदर
रक्खा तूने ? वो वालेका शरारा पूरा करना हे ना.. '

(ती तिला काम देणा-या जुम्मनवर एकतर्फ़ी जीव टाकत असते..ती त्याचं नांव घेत नाही..मात्र तिला जुम्मन त्या काळयाढुस्स् सीताबाईकडे रहातो हे आवडत नाही.)

लॆला: (दुपट्ट्याची कमरेवरची गांठ घट्ट करत ) 'होगा उदरीच. अम्माको
पूछ. अब्बूके बिस्तरके पास होगा. ’

कोसर: अम्मा हे क्या घरमे..? ओर अब्बू गया होंगा
नाकेपे..फ़ेरीवालोंकी खबर लेने..काम तो कुछ करता ने,,

लेला: कितना बोलती हे ! मेरेकू वो सीतामोसीका भांडन सुननेका था ना...

कोसर: (गल्लीतून दोन पावलं पुढे येते..) उसमें क्या सुननेका ? रोजका हे..वो भी परेशान हे..

लेला: वो कोन ?

कोसर: दुकानवाले ! वो छोड..मेरा सामान बता कहां हे..वो लालवाला धागा हे उसमें..वो दुकानवाले पूछने आएंगे अब्बी..

(भांडण ऐकण्यात रंगलेल्या लैलाचं फारसं लक्ष नसतं .इतक्यात लैलाच्या समोरच्या बाजूने आपला पत्रयाचा ढोल घेऊन गल्लीबाहेर पडणारा बुटका चंदर कौसरकडे बघत हंसतो. )

चंदर: सामान ?

(जोरात हंसतो..तो 'सामान' म्हणून हंसत असेल असं वाटल्यामुळे चिडून त्याच्याकडे रागाने पहात मग कौसर बोलते..)

कोसर: 'तेरेकू दात दिखानेको क्या हो गया ? जा अपना ढोल बजा जाके. उठाभी नही सकता ओर दात दिखाता !

चंदर: सरपे उठाके दिखाऊं क्या ?

लेला: (मधेच ) 'चंद्रूभैय्या किदर जाता आज तुम बजानेको ?'

चंदर: ‘है एक सुपारी. ’

लेला: ‘शादीका वास्ते ?’

चंदर: ‘नै रे. पूजा है किसीका घर. ’

कोसर: ‘ओ लैला , तू अपना कपडे धोनेका काम कर. फोकटकी दुनियादारी कायको मंगता तेरेकू? और ये बुट्क्याको तूने राखी बांधी थी क्या भाई बोलके ?’

लेला: ‘अरे हम मुन्शिपाल्टीका स्कूलमे एकसाथ आते जाते तो थे. ’

कोसर: ‘लेकिन अब तेरा तो बंद हो गया ना . वोभी कहाँ पढनेवाला था ? बस कर.’

(कौसरचा आवाज ऐकून जुम्मन टेलर दुकानाच्या दारात येतो..त्याने तिला शरा-याच्या एम्ब्रोयडरीचं काम दिलेलं असतं ते विचारायला..)

जुम्मन: अरी कोसर, वो कब पूरा करोगी शरारा..शामको गि-हाक आनेवाला हे..

कोसर: हो जाएगा, वोईच कर रही हूं..

जुम्मन: वो देके पेलेका पेसाभी ले जाना..

कोसर: वो तो लगेगाही, अम्मीको सामान लाना हे..

(हा संवाद ऐकत थांबलेला चंदर पुन्हा हंसतो..नि पुढे जातो..जुम्मनही परत दुकानात जातो..)

कौसर: लैला तेरा काम जलदी कर..इस्कूल तो छोड दिया..अम्मी कामसे आएगी तो सामान ले आना बनियेसे..

लैला: और वो उधारी मांगेगा तो...?

कौसर: अब्बू बैठा होगा उदरीच उसको बोल..

( कौसर आत जाते..लैला बिचारी परत शिडीजवळ कपडे धूत बसते, अशीच कोणाची तरी भांडणं ऐकत..)

(हे दुसरं भांडण संपलं तर तिकडे तिसरं पुन्हा सुरू झालं.)

सीताबाय: (दाराशी येत..) ए चंद्र्या, कुडं चालला बे तू ? आन त्यो ढोल उचलना झाला तरी बी घ्यून चाल्ला कुडं..? साळंला जातंय का न्हाई ?

चंदर: (थांबून) काय करू सीतामावशी, साळंला जावू का पोट भरू ? आय जाती क्वार्टरमंदी..पर बानं कर्ज घेतल्यालं हाय ना..आय बोलती का कर्ज फ़िटस्तवर वाजीव मंग वाजीव फ़कस्त भावाच्या लग्नात..

सीताबाय: आन त्यो भाव जातूय वेगनचा माल उतरवाय...घरला आनतो का नाय कायबाय..?

चंदर: नाय बा...कंत्राटदाराची नजर आसतीय समद्यांवर..पर त्येला गुटख्याचा लय नाद..

सीताबाय : ( हातातल्या भगुण्यातलं पाणी बाहेर टाकत आत जाताजाता..) शेवताला लावून दी संध्याकाळच्याला.. छपराच्या पत्र्यावर मिरच्या वाळत घालायच्या बोलली हुती ..आन तू लवकर ये घरला...पत्र्यावर चढाय पायजेल..

(आपला ढोल संभाळत जाताना गल्लीत शिरणारा बंगाली मच्छीवाला मन्सूर त्याला धडकतो.)

चंदर: ‘तेरेकू दिखता नै क्या ?’

मन्सूर: ‘दिखता तब्बीच बचाया तेरेकू . नैतो बाजूका नालीमे गिरता तुम. है तो रत्तीभरका. . ’

चंदर: तू हमेशा रत्तीभरका’ ने तो ‘घुटनेभरका’ क्यूं बोलताय, तूभी कहां उंचा पहाड हे ?

मन्सूर: तू हेही बटलू ओर उप्परसे यह तेरा ढोल..केसा दिखेंगा जोकरके माफ़िक...उप्परसे जुबान चलाता..!"

चंदर: (गुरगुरत) तू जा ना अपने रास्ते.

मन्सूर: तो किसको टेम हे तेरे मूह लगनेको..जा..वो तेरा ढोल संभाल ने तो फ़िरसे गिरेगा..

(वर घेतलेल्या चौकडीच्या लुंगीची अर्ध्यावर गांठ मारलेली, अर्धवट वाढलेली दाढी नि डोक्यावरच्या पत्र्यामधून मच्छीच्या पाटीतलं पाणी अंगावर सांडून भिजलेला नि घामेजलेला शर्ट अशा अवतारातला मन्सूर पुढे सरकतो , नेमका सीताबायच्या दारात..)

जना: ( वाटच पहात असलेली मागे पोराकडे बघत पुढे येते..आपल्या दारात ठेवलेली सीताबायची बादली पायाने ढकलते..)
'रूकना भैय्या. मेरेकू मच्छी मंगता ना. कबसे खडाय इदर..'

मन्सूर: 'तुमको बोला हमको भैय्या मत बोलो..हम भैय्या नही, बांग्लादेशका है.'

जना: 'लेकिन तेरी बिब्बी तो इदरकीच है ना. वो क्या, चालीके कोनेमे खडी तेरा रास्ता देखती हे. मन्सूर: (पाटी खाली उतरवून शिडीला टेकवतो..) 'वो किदर घरमे होगी ? गई होगी बकरेके वास्ते पत्ता लानेको. '

(मधूनच लेलाच्या डोक्यावर उजव्या बाजूच्या माळयावर असलेल्या खिडकीतून डोकावून सगळयांवर नजर ठेवणारी फरानाभाभी वरूनच बोलते,)

फ़रानाभाभी.: 'अरे वो तो कब्बी आई है दर्याके बाजूसे पत्तेका गठरी लेके. साथमे वो खेकडाबी लाई होगी. '

मन्सूर: 'हां. उसको वहीच एक काम है. अरी जनाबाय, कितना देखेंगी, ताजा मच्छी हे..कबसे खडा किया हे.. (पाटी घेऊन जनासाठी थांबलेला मच्छीवाला बोलतो).

जना: (मधेच मच्छी बघत ) ‘अच्छाही तो करती. बकरीईद सरपर है. तेरेकू बकरेका अच्छा पैसा मिलेंगा. ’

मन्सूर: ‘क्या मालूम. अब्बी तो वो पत्ता बेचनेको जाएगी शिवडीमे. उदर बकरेवाले लेतेच ना. ’

फ़राना: ‘उसकाबी तो पैसा मिलेगाच ना. ’

जना: (ह्या सगळयात रस नसल्यामुळे) ‘वो सब छोडो तुम लोग. मेरेवास्ते कुछ बचा है क्या बोलो. ’

मन्सूर: अब देख तो रही थी ना.. ‘थोडा मांदेली बचा है. सुभासे फेरी किया.. कोलनीमे सब खतम हुआ. ’

( सीताबाईने आपल्या दारातला भांडयाचा पसारा मुद्दामच विखरून ठेवते, बादली पुन्हा जनीच्या दारात सरकवते..जनीबद्दलचा राग काढायसाठी. मासेवाल्याने पाटी हातातच धरलेली. ते बघत मासे पहातानाच डावीकडून येऊन समोरच्या गल्लीत शिरणा-या शेवताबाईला मुद्दाम थांबवून जनी बोलते...)

जनी: ‘घेती का शेवताबाय् मच्छी ?’

शेवंताबाय: ‘हा. पैशे तू देती का? खा बाई तूच. तुहा दाल्ला रोजावर जातोय .’

जनी: ‘हा बाय. तवाच लोकं जळत्यात. आमी का खाऊने वशाटतिखाट ?’

सीताबाय: ( तोंडातल्या तंबाखूची पिचकारी नालीत टाकून सीताबाय बोलते ) ‘आपल्याला काम भेटलं तर खानार का नाय शेवते ? उगा दाल्ल्याच्या जीवावर उडया. पर तू का गं लवकर आली ? आज काम भेटलं नाय का ?’

शेवंताबाय: ‘आगं, आज कंत्राटवाल्याचा मेस्त्रीच नाय आला. गेला आसंन दुस-या कामावं. ’

सीताबाय: हां, त्येला लादीचं काम भेटलं का जातूय दुसरीकडं. पॆशे भेटत्यात ना..

(शेवंताबाय लादीवाल्या कॉन्टॆक्टरकडे रेतीसिमेन्टच्या बिगारीकामावर रोजानी पगार घेत असते. )

शेवंताबाय: आपल्याला काय, रेतीशिमिटाची घमेली द्यायची, कुटंबी त्येच आस्तंय.

सीताबाय: मंग तूबी त्या पंचीवानी त्ये टॆरेसच्या कांचा लावायचं काम घे..लई चांगला रोज भेटल..

शेवंताबाय: बगू..त्ये काय न्हेमी नस्तंय..भेटल तवा भेटल..जाती ग बाय्. पोरीनं काय रांधयलं बघते. रातच्याला त्यो यील बेवडा मारून. तेची कायतरी सोय बगाय पायजेल.’

सीताबाय:  ‘तूबी काय मसाला करती का ग ?’

शेवंताबाय:   ‘हा बाय. परवा बेवडयाला पैशे भेटले तं हानलं थोडं सामान. ’

सीताबाय:   ‘आगं बये, तूही लेक आल्ती इचाराय मले. ’

शेवंताबाय:   ‘काय म्हनं ती ? ‘

सीताबाय:   ‘म्हनं कशी, का काकी तुह्या पत्रयावं मिरच्च्या टाकू का वाळत. ’

शेवंताबाय:  ‘आगं मीच बोलली तिला. माहयावालं छपराचं पत्रं पार फाटून गेल्यालं. कुडं वाळत घालनार मंग? ’

सीताबाय:  ‘आगं माहयावालंबी तसंच हाय. बाजूवाली शेटानी आत्ताच लागली नं भांडाय्. पावसाच्च्या आदीच  ताडपत्री घालाय् पडंल. ’

शेवंताबाय:    ‘मालाबी सांग मंग तू आनशीन् तवा. पर तू का नाय गेली कालनीत ?’

सीताबाय:   ‘नाय. आज मह्या पोरीले दिली लावून. अशीबी साळा नाय करत न अख्खा दिस टिव्ही बगाय जाती. ह्या मोठया लोकाइले लई शौक टिव्हीचा. आपल्याला आसले शौक कराय् नाय भेटत. ’

(हे ऐकून मासे घेऊन घरात जाणा-या जनीचं टकुरं फिरतं. मासेवाला समोरच्या गल्लीत उजवीकडे विंगेत जातो. )

जनी: 'त्यासाटनं लेकीची भाड खाऊन पोट भरती का गं ? उगा लोकांवर जळत आसती; भाडखाव. '

सीताबाय: (संतापाने हातातलं धुतलेलं आल्मिनचं भांडं जोरात आपटत जोरात ओरडते,) 'भाडखाव कोन गं रांडं. तुह्या पदराचं खाती का मी ?'

जनी: 'पदरच टाकला का समदंच भेटते. '

(आपल्या दाराशी उभी जनी जोरात बोलते. तिचा निर्देश जुम्मनकडे हे सीताबायला कळत असतं. नव-याविना पोरीला घेऊन आईच्या खोलीत एकटीच रहाणा-या सीताबायबद्दल प्रवाद होते. काळी नि नकटी असली तरी सीताबाय तब्येतीने दणदणीत नि शिवाय तशी तरूण होती. आता तर पोरही वयात येणार. . सुमार रूपाच्या सीताबाईला नव-याने टाकलं होतं. पण पोर्ट ट्रस्ट कॉलनीतल्या लोकांच्या मदतीने वान्द्रयाला जाऊन तिने नव-याकडनं पोटगी मिळवली होती. शिवाय वर हे बाजूच्या खोलीचं भाडं होतंच. तिच्या खर्चाची सोय तिने केली होतीच. वर पोरीला झुळझुळीत कापडं घ्यायची. तिच्या मोकळया नि तोंडाळ वागण्यामुळे लोकांनी गेरसमज करून घेतले होते. आणि जुम्मन तसा तिच्याहून लहानच. पण लोकांची तोंडं कोण धरणार. )

सीताबाय: समदीच मान्सं तुह्या नव-यावानी नसत्यात !

जनी: आन समद्या बायाबी तुह्यावानी नसत्यात..!

( खरं कारण वेगळंच होतं. जनीच्या नव-याची बाहेर भानगड होती, तीही मुसलमानणीकडे. असं कौसरच्या अम्मीकडनं कळलं होतं. केव्हांतरी पाण्यावरच्या भांडणात सीताबायने बोलून दाखवलं होतं. म्हणून जनी तिचा रागराग करायची. तिला नेहमी धास्ती वाटायची केव्हांतरी ही बया आपल्याच नव-याला नादी लावेल !)

शेवताबाय: 'बया बया बया ' का गं भांडान करायल्या दोगीजनी ?
जे ते आपल्या पदराचंच खातंय् बये. का कालवा करायल्या?
जावा गुमान. '

(असं म्हणत शेवताबाय मच्छीवाल्याच्या मागून घराकडे निघाली. त्याच गाल्लीत..तोच आपल्या माळ्याच्या खिडकीशी आलेली कौसरची शेजारीण फरानाभाभी माळयावरनंच तिला हंसत बोलते,)

फ़रानाभाबी: 'तूबी क्या सुनती इनका तमाशा . थोडा टैमके बाद गले
मिलेगी दोनो. '

(ती मग आपले ओल्या कपडयांचे बोळे वरून पिळून वाळत घालायला लागते. खाली कोणीच नाही असं समजून. खालून मग लैला ओरडते.)

लैला: (कपडे पिळता पिळता) क्या चाची ? तुमबी ना...नीचे देखो तो.

(भांडणाचा आवाज ऐकून पुन्हा दाराशी आलेला जुम्मन त्या दोघींच्या भडीमाराने लगेच आत जातो. उगा तमाशा त्याला पसंत नाही. आपण नि आपलं काम ह्यातच तो खूष होता. चांगला डिझायनर असल्यासारखे लेडिज ड्रेस शिवायचा. त्याचं दुकानवाल्यांच्या ऑर्डरींच काम खोळंबलेलं होतं. दोघं टेलर नुसते बसवून ठेवून भागणार नव्हतं. तो मग भराभरा शरारा कट करायला लागतो. ईदच्या ऑर्डर असतात..गेल्या रमझानसाठी मोहल्ल्याच्या बाहेरनं पण ऑर्डरी आलेल्या होत्या. )

(सीता मग जनीकडे पहात हातवारे करत घरात जाते. तरी जनी दाराशी बडबडत रहातेच. आपल्या खिडकीतून अजून डोकावत असलेली फरानाभाभी गिड्ड्या छपराखाली धुतलेला कपडा लटकवत म्हणते.., )

फ़रानाभाबी: 'अब कायको आवाज करती ग तू ? वो तो अंदर गई ना अपने कामसे ? बिना झगडेका एक दिन नै जाता तुम लोगांका.'

(इतक्यात घरकामं करून परतणा-या कौशीला बघून, आत जाणारी फरानाभाभी खिडकीतून आपलं डोकं घारीसारखं पुन्हा बाहेर काढते. )

फ़रानाभाबी: ‘इतना जल्दी कैसे आई ग तू आज ? तेरा बुटक्या तो अब्बीच गया बजानेवास्ते. ’

(फराना भाभीला मधेच मराठी बोलायची लहर येते म्हणून  मग ती नुसतंच अगं तूगं करते. चंदर आज वाजवायला जाणार हे कौशीला माहित असतं नि थोरला तर सकाळीच बाहेर पडलेला.)

कौशी:  ‘पानी कोन भरेगा बाई. मेरा तो दोनो बेटा भार. अभी तो वो बुढ्ढीने पंप बंद किया होगा.’

फ़रानाभाबी:  ‘वैसीच है वो. तू डर मत. नै होंगा तो मेरे टीपसे दो बाल्टी लेके जा. मेरेको तो इतना लगता नै. अपनीच बौबेटीको पानी बेचती. क्या करती पैसेका क्या मालूम .’

कौशी:  ‘अपने जवाईको पोसती फुकटमे. पासमेच रख्खा है बेटीको. उसको क्या मालूम आगे कुछ होयंगा तो बेटी कुछ कामकी नै .’

फ़रानाभाबी:  वो छोड, ‘तूने कुछ सुना क्या ? पोट्रस्टवालेके बारेमे. ’

कौशी:  ‘हां. वो संजय आके गया पिछूका मार्बलका कारखानावालेके पास. ’

फ़रानाभाबी:  ‘अरी, वो आया होंगा पार्टीका चंदा मांगनेवास्ते. ’

कौशी:  ‘क्या मालूम. मै चंदरको भेजी कामकेवास्ते. वो सुनके आया कि पोट्रस्टवाले झोपडा हटा देंगे, ऐसा संजय बोलता था. अब मोर्चा निकालनेका बोला. ’

(इतक्यात पाणी टाकायला बाहेर आलेल्या सीताबाय मोर्चा शब्द ऐकून कान टवकारते नि कमरेवर हात घेऊन उभी रहाते...तिच्या खूपच आवडीचा विषय. पार्टीवाल्यांकडनं नाश्तापाणी , वडापाव नि वर पैसे मिळायचे. पण ते फक्त व्होटिंगसाठी हे तिला कळलं नाही. आपल्या झोपडया वाचवायसाठी संजय कशाला पैसे वाटेल.)

सीताबाय: ‘कुडं चालली ग मोर्चा घ्यून ?’

(सीताबायचा आवाज ऐकून जनी पुन्हा दाराशी येते, मच्छी साफ करता करताच. )

कोशी: ‘मी नाय् गं बाय्. त्यो तुहा भगवा बावटावाला संजय आल्ता काल सांगाया का आपून पोट्रस्ट हापिसावर मोर्चा घ्यून जाव्या म्हनं. थोडया टायमानं यीन म्हनला. ’

सीताबाय: ‘आगं, मंग ह्ये समदं आल्याआल्याच सांगावं का न्हाई ? अजून जेवानबी नाय बनावलं .’

कोशी: ‘का गं? तू काय लगी जायाला निगाली का काय ?’

जनी: (जनी तोंड उघडते. ) ‘त्ये तर मीबी जानार हाय. काल मालाबी बोलला तेचा मानूस. ’ .

(संवाद ऐकत दाराशी आलेल्या जनीने आधीच कानोसा घेतलेला असतो.)

सीताबाय: ‘मंग सांगावं का नाय मान्सानं. मोर्चासाटनं कोन एकलं जातं का काय कंदी. ’

(मघाचं सगळं भांडण विसरून सीताबाय जनीला बोलते. तशी कौशी तोंडावर पदर धरून हंसते.. )

सीताबाय:  'कां ग हंसायली तू ? तू येनारच नाय् जनू. '

(सीताबायला कळलेलं असतं कौशी का हंसतेय ते. !)

कौशी:  'आगं बये, तुह्या त्या भगव्या बावटंवाल्या संजयला आमी कसं चालावं बाई. आमी निळं बावटंवालं !'

सीताबाय:  'मंग काय झालं. पैसं तर द्याया लागलंच ना ? आन् चानाश्ताबी भेटतोयच कि. '

(फ़रानाभाबी खालच्या बंद घरात साबण बनवून हातगाडीवर विकायला नेणा-या भैय्याच्या माळयावर भाडयाने रहात असते. तिला मोर्चाशी कांही देणंघेणं नसतं. खिडकीतनं मान बाहेर काढून ती कांहीच काम नसल्यासारखी ऐकायला लागते ! सीताबायची पैसे घेऊन मोर्चात मिरवण्याची हौस तिला माहित असते !)

फ़रानाभाबी: (हंसत हंसत कौशीला म्हणाते) ,'तूबी जा गं. तेरे झंडीका रंग कोई देखता नै गं. '

(तिचं ऐकून हंसत कौशी शिडीच्या बाजूने समोरच्या गल्लीत निघून जाते.)

फ़रानाभाबी:  ‘पानी लेने आ जा गं तू खाना खाके. ’ (भाभी डोकं आत घेते) ..

सीताबाय: (फ़रानाभाबीच्या खिडकीकडे बघून जनीकडे वळते ) ‘जा बाय. तुही मच्छी खराब व्हईन. लेकराले खायाला घाल आन् तयार -हाय. ’

जनी:  ‘आन् मंग तू काय करती जेवनाचं ? तूही लेकबी यीलच की कामं करून. ’

सीताबाय: ‘हाय कालचं ठेवल्यालं. खाईन आपल्या हातानं घ्यून. आन् तू तयार व्हय लवकर. मी कापडं बदलती तंवर. ’

जनी:  ‘लगी निगाय कशाला पायजेल. त्येला येऊ तं दे. ’

सीताबाय: ‘मंग माही वाकळ पिळाय लाग. तुह्या कपडयाचं पानी पल्डं सकाळी . मी सांगायली असती तर भांडाय बसली आसतीस. ’

(मग दोघीनी मिळून सीताबायची भिजलेली जाडजूड वाकळ दोही बाजूनी धरून पुन्हा पिळतात नि दारात शिडीच्या बाजूला नायलॉनच्या दोरीवर टाकतात. )

सीताबाय:  ‘आन् माह्यावालं काम व्हईन आता. टेलरला ध्यान ठेवाय सांगती. तुह्या पोराला दे  लावून मह्या  लेकीकडं. दोगांचाबी टाईमपास व्हईल. ती आली का मंग जायाचं व्हईन तर. ’

जनी: ‘कशापायी ? फ़ुडं त्यो टेलर हायच कि. तुही ल्येक बसन मह्या कम-यात .टिव्ही बगायले. ’

(सीताबाई नुसतीच हांसते नि नुकत्याच आलेल्या लेकीला घेऊन आत जाते. आपल्या खिडकीत बसून त्या दोघींच संभाषण ऐकत असलेली फरानाभाभीही मग हंसत आत जाते .)

(मोर्चाचं नांव ऐकून दोघींच भांडण मिटतं. थोडयाच वेळा्त नकटया नाकात खोटी चमकी नि गळयात कसली माळ घालून भडक पातळ नेसलेली सीताबाय आपल्या बोळकंडीच्या दारातून बाहेर पडते नि शेजारी बघून जनीला पुकारते . मधेच कपडे धुणा-या लैलालाही आवाज देते. )

सीताबाय: ए बये जने चाल ना आता..आन ए लैला, तूबी काम करके इदरीच बैठ मेरी बेटीके साथ. ’

लेला: (साबणवाल्याच्या बंद दुकानाच्या दारात कापडं सुकवत घालताना..) ‘हां चाची. पर वो बच्चा टिव्ही देखने देगा क्या? मेरेकू वो शादीवाला सिरिअल देखना है. ’

जनी: ‘हा. तुम दोनों मिलके टिव्ही देखना. और मेरे बच्चेकोबी. ’.

सीताबाय: ‘ऐकती का ग टवळे ? तुमी दोगीबी बसा हिकडंच .आपल्या कम-यावं टेलर ध्यान ठयेईल.’

( वरच्या अंगाने म्हणजे उजव्या विंगेतून एक माणूस चारपाच बाया नि पोरं घेऊन येतो.. दोन पोरांच्या हातात दोन बांबूला एक ‘झोपडी बचाओ’ चा लांबलचक बॅनर . ती पोरं चालताना जवळ आली कि ती अक्षरं दिसेनाशी होतात. मग तो संजय दुधाणे नांवाच्या नगरसेवकाने पाठवलेला माणूस त्या पोरांवर खेकसतो. बायांच्या हातात पार्टीची भगवी निशाणं. आत्ताच मैत्रिणी झालेल्या ह्या दोघी तयार असल्यासारख्या त्याला सामोरं जातात... )

सीता: ‘आता कुडं जायाचं ओ भाऊ ?’

भाऊ: ‘अगोदर वस्तीच्या भाएर तर चला. आन् तुम्हालापण झेंडा घ्यावा लागेल. ’

(काळी सीताबाय पुढे सरसावते. तशी तो तिला मागे सारून झेंडा जनीच्या हातात देतो. जरा तरूण नि उजळ असलेली, झुळझुळीत साडी नेसलेली जनी पुढे होते. तिला पुढे व्हायला सांगून तो घोषणा देतो ),

भाऊ: ‘आवाज कुणाचा ? ’

(मागची पोरं त्याला प्रतिसाद देतात.)

पोरं: भगव्या बावट्याचा..

(पुन्हा एकदा..)

भाऊ: आवाज कुणाचा ?’

पोरं:  संजयभाऊंचा...!  ( नि तो मोजून साताठ जणांचा मोर्चा निघतो!)

(सीताबाईची पोर जनीच्या पोराला कडेवर घेऊन जनीच्याच दारात उभी ; तिच्या शेटानीने दिलेलं केळं त्या पोराला भरवत असते ! कपडे दोरीवर टाकून लैला तिला कायतरी विचारते !  नि दुकनाच्या दाराशी आलेला जुम्मन त्या दोघी बायांकडे पहातच रहातो ! आपल्याला मागे सारून जनीला झेंडा दिला म्हणून जरा खट्टू झालेली सीताबायही  मग घोषणा द्यायला लागते. वडापाव केव्हां मिळतो ह्याची वाट बघत . मग तो साताठजणांचा मोर्चा ( ? ) गल्लीच्या तोंडाशी असलेल्या चक्कीजवळ पोहोचतोय् तोवरच वाळत घालायसाठी मिरच्यांचं बोचकं घेऊन शेवताबाय येते नि खिडकीशी असलेल्या भाभीला विचारते , )

शेवताबाय:    ‘इतनी जल्दी गया क्या वो लोग ?’

फ़रानाभाबी:   ‘हां बाय. मोर्चा बोले तो उनका भांडन खतम. कितना झगडा करती दोनों. देखा ना. ’

शेवताबाय:    ‘हां. तब्बीच मै बोली कि मेरा मिर्ची सुखानेको डालती पत्रेपर तो बहाना क्यूँ करती थी. ’

फ़रानाभाबी:   ‘अब नही करेगी. उनका भांडन खतम हो गया ना. जा. सीढीपरसे जाके तेरा मिर्ची डाल पत्रेके उप्पर.. लेकिन अबके कोई नया झगडा न लाए दोनों तो अच्छा. ’

(शेवताबाई मग बाजूच्या शिडीवरनं जनीच्या छतावर जाते मिरच्या वाळत घालायला ! ..अजूनही आपल्या खिडकीतनं मोर्चा गेल्या दिशेकडे बघणारी फरानाभाभी सीताबायच्या माघारी पण तिलाच उद्देशून म्हणते, )

फ़रानाभाबी: ‘अब हाथमे झंडी नही दी करके वापस झगडा मत करो.’

( ती असं म्हणतेय् तोवर पाठीमागच्या कारखान्यांच्या बाजूने तिला दुपारच्या नमाजाची आजान ऐकू येते. )

फ़रानाभाबी: (स्वत:शीच ) "इन्शाल्ला !‘ सच है. अब दुवा मांगूगी उन दोनोके लिये !

(असं स्वत:शी म्हणत ती खिडकीतून आत जाते .)

००० ०००

विजय खाडिलकर 1403, माझगांव टॉवर्स, म्हातारपाखाडी, माझगांव, मुंबई 400010

दूरध्वनि: 23776889, मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

# विजय खाडिलकर यांची पुस्तके.




विजय खाडिलकर
धर्म




**या तीनही कव्हरवर क्लिक करताच ते ते पुस्तक उघडेल.**